Impact Factor – 6.625

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January - 2020 Special Issue – 236 (D)

## Introspection, Prognosis and Strategy for Global Water Resources



**Guest Editor :**
Dr. Devidas S. Gejage
I/C Principal,
Sameer Gandhi Kala Mahavidyalaya,
Malshiras, Solapur, Dist. Solapur

**Executive Editors :**
Mr. Santosh P. Mane
IQAC Cordinator
Sameer Gandhi Kala Mahavidyalaya,
Malshiras, Solapur, Dist. Solapur

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 71 | शेतकरी दिर्घकाव्यातील दुष्काळजन्य परिस्थितीचे चित्रण | डॉ.बालाजी डिगोळे | 322 |
| 72 | मराठी साहित्यातील दुष्काळाचे चित्र | डॉ.सुनिल धनकुटे | 327 |
| 73 | देशातील पाणी समस्या आणि त्यावरील उपाययोजना | डॉ.देविदास गेजगे | 331 |
| 74 | व्यंकटेश माडगुळकर व रा.रं.बोराडे यांच्या कथेतील दुष्काळाचे चित्रण | प्रा.शोभा मिसाळ व सपना जाधव | 335 |
| 75 | समकालीन मराठी ग्रामीण कथेतील पाणी समस्या आणि स्त्री जीवन | प्रा.सौ.निर्मला मोरे | 338 |
| | ग्रामीण कवितेतील दुष्काळाचे चित्रण | प्रा.संजय चव्हाण | 343 |
| 76 | बनगरवाडी या कादंबरीतील दुष्काळ | प्रा.दादा साठे | 348 |
| 77 | धरणग्रस्तांच्या जीवनाची 'झाडाझडती | प्रा. दादा यमगर, डॉ. बिरा पारसे | 351 |
| 78 | मराठी कवितेतील दुष्काळ आणि शेतकऱ्यांचे चित्रण | प्रा.सुहास उघडे | 355 |
| 79 | A Tragedy of Indian Agriculture: Farmer's Suicide | **Prof. Vinayak B. Suryawanshi, Miss. Chaitali N. Mane Deshmukh** | 361 |
| 80 | संत साहित्यातील दुष्काळाचे चित्रण | डॉ. सुनिता सूर्यवंशी | 365 |
| 81 | उर्जा बचत एक काळाची गरज – एक अभ्यास | श्री.संदीप एडकेवार व श्री.तुषार साबळे | 370 |
| 82 | ग्रीन लायब्ररी | अमर दीक्षित | 373 |
| 83 | इको-फ्रेंडली पर्यावरण पूरक साधनांचा ग्रंथालयात वापर | डॉ.वैशाली मोरे | 376 |
| 84 | पिण्याचे पाणी : समस्या व उपाय | डॉ.बाळासाहेब मुळीक | 380 |
| 85 | मानसशास्त्राचे पर्यावरण आणि इतर क्षेत्रातील उपाययोजना | प्रा.अनिल मुंगूसकर | 387 |
| 86 | फळबाग शेतकरी आणि बिगर फळबाग शेतकरी तरुणांच्या व्यक्तिगत ताणाचा अभ्यास | श्री.रवींद्र माने व डॉ. रवींद्र घोती | 392 |
| 87 | जलप्रदूषण प्रतिबंध, नियंत्रण व उपाययोजना | श्री. प्रविण साळुंके | 396 |
| 88 | प्राचीन ग्रंथातील आणि शिवकालीन जलव्यावस्थापन .. | डॉ. विश्वनाथ आवड | 401 |
| 89 | महात्मा गांधीजींचे दक्षिण आफ्रिकेतील कार्ये | प्रा.वर्षा डोंबाळे | 408 |
| 90 | पाणी व्यवस्थापन आणि नियोजन | डॉ.गणपती वाघमोडे | 412 |
| 91 | प्राचीन व शिवकालीन पाणी नियोजनाचा सद्य स्थितीत होणारा उपयोग | डॉ.मंदाकिनी देवकर /गोडसे | 415 |
| 92 | राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत जल संवर्धन व श्रमसंस्कार मुल्ये रुजवणुकीसाठीचे विविध उपक्रम आणि त्यांच्या परिणामकारकतेचा अभ्यास | डॉ.परमेश्वर पाटील | 418 |
| 93 | पर्यावरणाचे बदलते वातावरण | डॉ.अनिल कांबळे | 421 |
| 94 | पर्यावरण – जल कायदा १९७४ | डॉ.जी.आर.गायकवाड | 424 |
| 95 | पर्यावरण शिक्षणासाठी व्याख्यान पद्धती व सहकार्ययुक्त अध्ययनाच्या परिणामकारकतेचा अभ्यास | डॉ.रविराज फुरडे | 427 |
| 96 | जलसंवर्धन व जलव्यवस्थापनासाठी जल साक्षरतेची आवश्यकता | प्रा.ईश्वर राठोड | 430 |
| 97 | कादंबरीतून आलेले दुष्काळाचे चित्रण विशेष संदर्भ 'चारापाणी' | डॉ.दीपक सूर्यवंशी | 433 |
| 98 | पर्यटनसाठी "राष्ट्रीय" आणि "आंतरराष्ट्रीय" ग्रंथालय | कु. सपनाराणी एस. रामटेके | 437 |
| 99 | कोल्हापूरसंस्थानातील'राधानगरी'धरणाचेयोगदान | डॉ. किशोरकुमार गव्हाणे | 441 |
| 100 | कृष्णा –भिमा स्थिरीकरण प्रकल्प | Mr. Santosh P. Mane | 447 |




112

# कादंबरीतून आलेले दुष्काळाचे चित्रण विशेष संदर्भ 'चारापाणी'

**डॉ.दीपक सुभाषराव सूर्यवंशी**
मराठी विभाग
शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब
ता. कळंब, जि. उस्मानाबाद - ४१३५०७
मो. ९४२०९५८६९९
ईमेल : deepaks2021@gmail.com

**प्रास्ताविक :**

महाराष्ट्रात असलेल्या गोदावरीच्या खोऱ्यातील असलेला मराठवाडा विभाग मराठी समाज आणि संस्कृती, शिक्षणाचा प्रारंभच फार उशीरा झाल्याने २० व्या शतकाच्या उत्तरार्धात झाला. परिणामी निजामी राजवटीत प्रभावित झालेला भूभाग सामाजिक जीवन कुंठीत झाले. सामाजि, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक स्थितीचे वर्णन कादंबरीतून आलेले आहे. मराठवाड्यातील अनेक कादंबरीकाराने दर्जेदार वास्तव लेखन केले आहे. बी. रघुनाथ, वि. शं. पारगावकर, लक्ष्मीकांत तांबोळी, ना. धों. महानोर, सुखराम हिवराळे, भगवान काळे, त्र्यंबक आसरडोहकर, बाबा भांड, महावीर जोंधळे, नागनाथ कोत्तापल्ले, भास्कर चंदनशिव, वासुदेव मुलाटे, गणेश आवटे, रेखा बैजल, अनुराधा वैद्य, मधू सावंत, छाया महाजन, शेषराव मोहिते, बा. ह. कल्याणकर, लक्ष्मीकांत देशमुखे, योगीराज वाघमारे, डॉ. जनार्धन वाघमारे, रंगनाथ तिवारी, गोविंद देशपांडे, भारत काळे, भास्कर बडे, बालाजी इंगळे, भारत सासणे, कविता महाजन, उमेश मोहिते अशा अनेकांनी दैनंदिन समाजजीवनाचे वास्तव वर्णन केले आहे. या भूप्रदेशातील एक सुप्रसिद्ध कथाकार व कादंबरीकार म्हणून रा. रं. बोराडे परिचित आहेत.

**कादंबरीची संकल्पना - स्वरूप :**

'कादंबरी म्हणजे संसारचित्र' - डॉ. उषा हस्तक. इंग्रजी साहित्यिक व साहित्याच्या वाचन, लेखन व अनुकरणातून मराठी कादंबरीची निर्मिती झाली. मराठीत कथा प्राचीन काळापासून प्रचलित होती. कथेला कथात्म व्यापक स्वरूप प्राप्त झाले आणि पुढे कादंबरीचा प्रारंभ झाला. एका विशिष्ट कल्पित कथेला कादंबरी असे कुसुमावती देशपांडे यांनी मराठीत बऱ्याच आधीपासून असल्याचे सांगितले आहे. कादंबरीला इंग्रजीत नॉव्हेल असा प्रतिशब्द वापरले गेले. थोडक्यात कल्पित कथा म्हणजे कादंबरी होय. या संदर्भात अनेक कादंबरीकारांनी व्याख्या केल्या आहेत. परंतू कोणत्याही एका व्याख्येतून कादंबरीचे व्यवच्छेदक लेखन सांगितले गेले नाही. तरी कादंबरी वाङ्मय प्रकाराचे जनकत्व 'फिल्डींग' या लेखकास प्रदान करण्यात आले आहे. तसेच कॅथरीन लिव्हर यांनी केलेली कादंबरीची व्याख्या सर्वसमावेशक असल्याचे मानले जाते.

१. ''कथात्मक लिखित गद्याचा बऱ्यापैकी दीर्घ म्हणता येईल असा, तसेच लेखकाने निर्मिलेल्या नव्या आणि कल्पित वास्तवात वाचकाला गुंगवून टाकणारा रचनाबंध म्हणजे कादंबरी होय.'' (इंग्रजी शब्दकोश)
२. ''कादंबरी म्हणजे समाज व निसर्ग या विरूद्धच्या चाललेल्य संघर्षाचे महाकाव्य होय, यात समाज-निसर्गाशी व्यक्तींचा चाललेला लढा याच्याशी केंद्रभूत असल्याचे दिसून येते.'' (डॉ. मदन कुलकर्णी)
३. ''कथानक, व्यक्तिचित्रण, लेखकाचा दृष्टीकोन व यांना अनुरूप अशी निवेदन शैली, वातावरण निर्मिती, तंत्रे, इ. घटकांनी विस्तृतपणे संघटित केलेले वास्तव जीवनाचे चित्रण म्हणजे कादंबरी होय.'' (प्रा. रा. ग. जाधव, मराठी विश्वकोश खंड-३)



Scanned with OKEN Scanner

४. "कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशय सूत्राची अनेक पदर असलेली त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी अनेक पात्रे, प्रसंग, अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेली आहेत अशी साहित्यकृती असते." (भालचंद्र नेमाडे)

यात रा. रं. बोराडे यांच्या 'चारापाणी' या कादंबरीची भाषा साधी मराठवाडी, सोपी, प्रसंगानुरूप वातावरणाचा पूर्णत्वाने स्वीकार करणारी ओघवती आहे. कमी शब्दात व्यापक आशय, पाल्हाळीकतेपासून दूर प्रतिमा, प्रतीकांचा वापर करणारी व घटना प्रसंगांचा अन्वयार्थ विस्तृतपणे अभिव्यक्त करणारी आहे.

मराठवाड्यात अनेक कादंबरीकार यात र. वा. दिघे हे पहिले प्रादेशिक कादंबरीकार, १९६० नंतरचे एक प्रभावी ग्रामीण कादंबरीकार म्हणून रा. रं. बोराडे होत. त्यांनी विविध कादंबरीचे लेखन केले. पहिली कादंबरी पाचोळा (१९७१), सावट (१९८७), चारापाणी (१९९०), महानगाव (१९९३), रहाटपाळणा (१९९६), मरणदारी (१९९६), आमदार सौभाग्यवती (१९९८), इथं होतं एक गाव (२०००), शिका तुम्ही हो शिका (२०००), वळवाच पाणी (२००७), रिक्त अतिरिक्त (२००९), नामदार श्रीमती, इ. एकापेक्षा एक सरस आणि सकस कादंबऱ्या मराठी साहित्याला दिल्या. या सर्वच कादंबऱ्यामध्ये सामान्य माणूस व समाजातील प्रश्नाविषयी चिंतन केले आहे. एकूणच कादंबरीलेखनात विषयाचा व्यापक पट कथानक, व्यक्तिरेखा, संवाद प्रकटीकरण, निवेदन, वातावरणनिर्मिती, भाषाशैली व परिणामकारक मांडणी या सर्वच बाबतीत बोराडे यांच्या साहित्याची पकड मजबूत दिसून येते. झपाट्याने खेड्याचे ही शहरीकरण होत आहे. परिणामी सर्वच ग्रामजीवन बदलून गेले आहे. वास्तव रेखाटल्यानेच शेतकरी, कष्टकऱ्यांचे कैवारी म्हणून त्यांचा नामोल्लेख केला जातो. त्यांच्या लेखनात क्वचितच शृंगार व मनोरंजनाची मांडणी आलेली दिसून येते.

ग्रामीण भाग, कृषीसंस्कृती व शेतकऱ्यांच्या भावभावनांचा आलेख या कादंबरीत रेखाटला आहे. शेतीशी संबंधीत अनेक संदर्भ सण-उत्सव, यात्रा-खेत्रा, लग्न सराई याविषयीचे अनेक संदर्भ तसेच शेतातील पिकांची रास केल्यानंतर त्यांना मोकळा वेळ मिळतो. मगच सर्वकांही असे जीवनातील चित्र आहे. त्यांच्या लेखनातून आविष्कृत होणारे विश्व म्हणजे शेती-भाती, पिकपाणी, वारा, पाऊस, इ. विषयीची मांडणी अपरिहार्य त्यात आलेली आहे. मराठवाडा परिसर हा कादंबरीचे कार्यक्षेत्र आहे. निसर्गाच्या लहरीपणावर आधारीत असलेला शेती व्यवसाय हा लोकजीवनाचा आधार आहे. शेती हा निसर्गावर आधारित असल्याने वेळोवेळी दुष्काळाचा सामना करावा लागतो. दुष्काळ हा कधी कोरडा तर कधी ओला असतो. म्हणूनच तेथील माणूस हा दारिद्र्याच्या विळख्यात सापडलेला आहे. तसेच हा सामान्य माणूस अडाणी असल्याने त्याला रूढी परंपरात, नात्या-गोत्याच्या बंधनात अडकून पडावे लागते. रा. रं. बोराडे यांनी आपल्या अनुभव वास्तवाला अभिव्यक्त करण्यासाठी ग्रामीण कादंबरी या वाङ्मयप्रकाराची निवड केली आहे. ग्रामीण समस्यांची उकल करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत 'चारापाणी' या कादंबरीमधून त्यांनी मांडलेली भूमिका ही एक प्रकारची सामाजिक बांधिलकी आहे. खेड्यातील माणसे ही शेतीवर आपला उदरनिर्वाह करणारी आहेत. बऱ्याचदा शेतीसाठी असलेली निसर्गाची किमया ही कधी शाप तर कधी वरदान ठरते. एखाद्या वेळी पाऊस कमी पडला तर साहजिकच मोठा दुष्काळ पडतो. परिणामी जनजीवन पूर्णतः विस्कळीत होते व जगण्याचा गंभीर प्रश्न निर्माण हातो. १९८४-८५ या साली असाच दुष्काळ पडला. पाऊस कमी पडल्याने खरीप-रब्बी ही दोन्ही पिके हातची गेली. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न संपूर्ण महाराष्ट्रभर निर्माण झाला. समाजातील इतर वर्गापेक्षा शेतीवर जगणारा शेतकरी-कष्टकरी वर्ग अधिक भरडना जाऊ लागला. अशातच माणसं आणि जनावरं कसे जगणार हा ज्वलंत प्रश्न त्यांच्या पुढे उभा राहिला.

साधारण भर उन्हाळ्यात मार्च ते मे दरम्यान दुष्काळाची तीव्रता अधिक दाहक झाली. माणसांसाठी शासनाकडून दुष्काळी कामे व गुराढोरांसाठी कांही सेवाभावी संस्थांनी चारा छावण्या काढल्या. परंतू त्या ठिकाणी



174

Scanned with OKEN Scanner

ISSN : 2348-7143
January-2020

बैल पाठवून शेतीचा प्रश्न सुटणार नव्हता. फारतर बैल जगतील मात्र शेतीतील मशागतीचे कामे जशास तसेच राहतील. हीच परिस्थिती लक्षात घेऊन अंबाजोगाई येथील मानवलोक संस्थेने एक अभिनव योजना आणली होती. ती म्हणजे दिवसभर शेतकऱ्यांना बैलाकडून शेतीची मशागत करून घ्यायची आणि संध्याकाळी केवळ दहा पैसे भरून ही बैल छावणीत आणून सोडायची. या योजनेचा शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला.

ग्रामीण समाजजीवनाचे वास्तव रेखाटताना त्यांच्या होरपळून जाणाऱ्या कुटुंबव्यवस्थेत व्यथा, वेदना, दुःख तसेच परिस्थितीसमोर हतबल झालेला शेतकरी, त्याने अत्यंत कष्टाने पिकवलेल्या शेतमालाला हमीभावही मिळत नाही. बदलत्या दैनंदिन व्यवस्थेत समाजकारण, राजकारण, अर्थकारण, परस्परावलंबी जीवन, इ. अनेक समस्यांना कादंबरीतून अधोरेखित केले आहे.

'चारापाणी' कादंबरीतील नायक सुखदेव आपले शिक्षण संपवून घरी परततो. त्यावेळी त्याला गावात रोजगार नाही, पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो. जनावरांना चारासुद्धा मिळत नाही. दैनंदिन जीवन उदरनिर्वाहासाठी लोक कोठेही हाताला काम मिळेल ते करतात. संवेदनशील मनाच्या सुखदेवला गाव दुष्काळाने कसे होरपळून निघाले याची कल्पना येते. घरी जाताच आई त्याला तांब्याभर पाणी पिण्यास देते. शिवाय अंघोळीसाठी पाण्याचा वापर कसा करावा हे ही सांगते. पाणी नाही, चारा नाही, दोन बैल होते ते कसे विकले गेले हे सुद्धा त्याला समजते. काही शेतकरी अशा परिस्थितीत बैल सांभाळणे शक्य नसल्याने अशी जनावरे मोकळी सोडून देतात. अशा बैलांना आबाराव शेळके सांभाळतो. अशा वेळी सुखदेवाला प्रश्न पडतो की, भविष्यात शेती कसायची कशी? शेतकरी मशागत कसे करणार? त्यामुळे पुढच्या वर्षी आपल्याला शेती करण्यासाठी बैलांची गरज आहे, म्हणून आबारावने चारा उसनवार द्यावा असे सुखदेवला वाटते, पण आबाराव ते मान्य करत नाही. तेंव्हा सर्व शेतकरी सुखदेवावरच संतापतात.

'माणूस' माणसापासून दुरावला जात आहे याचे अनेक कारण आहेत. त्यातील एक कारण 'पाणी' पिण्यासाठी नाही, गावाची वाताहत होते, पाण्याचे टँकर आणून विहिरीत टाकतात व ते पाणी आपल्याला मिळावे यासाठी नाते गोते दूर ठेवून लोक संघर्ष करतात. त्यातून अनेक भांडणे विकोपाला जातात. ही परिस्थिती पाहून सुखदेव यावर उपाय म्हणून तो शिकलेला असल्याने या पाणीप्रश्नावर बी.डी.ओ. ला निवेदन देतो. त्यात तो नमूद करतो, आबाराव शेळकेची चाऱ्याची गंजी ताब्यात घेऊन तो चारा इतर शेतकऱ्यांना द्यावा. पण त्याच्याकडे कोणीही लक्ष देत नाही. अशातच आमदाराला आपण जिल्हा बँकेचे चेअरमन व्हावे वाटते, त्यावर तो सामान्य माणसाच्या चारापाण्याचा प्रश्न न सोडवता, श्रीमंत शेतकऱ्यांच्या विहिरीत बोअर पाडून त्यांना ऊसाचे क्षेत्र वाढविण्याचा प्रयत्न करतात. गावातील शेतकरी आधीच आपली बैल जनावर आबाराव कडे दिलेले असल्याने हवालदिल होतात. आपली शेतीसुद्धा देतात. नंतर आपल्याच शेतात ते सांगतील त्याप्रमाणे कामे करायला तयार होतात. त्यावर ही परिस्थिती लक्षात घेऊन सुखदेव सर्व लोकांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करतो. मात्र भयानक परिस्थितीने ते सर्वजन बेजार झालेले असतात. यावर सुखदेव सर्व शेतकऱ्यांना सांगतो की, "आपले बैल जनावरं घेऊन तहसील कार्यालयात जायचे व तेथेच ते सर्व बांधायचे." तेंव्हा त्या बैलाच्या व जनावरांच्या गळ्यात पाट्या अडकवतो, तो पुढाकार घेऊन बैलांसाठी तो असे आंदोलन करतो, मराठवाड्यातील पाण्याची गंभीर समस्या रा. रं. बोराडे यांनी तीव्रतेने कादंबरीतून मांडली आहे. दुष्काळासोबतच लोकांसमोर अन्न, वस्त्र, चारा, पाणी, रोजगार या समस्या आ वासून उभ्या राहतात. त्या प्रसंगासमोर माणूस हतबल कसा होतो ते विशद केले आहे. चारापाणी प्रश्न किती गंभीर होऊ शकतो याचा वेध त्यांनी घेतला. त्याच्या नंतरच्या काळात लातूर येथे २०१३ मध्ये सांगली येथून रेल्वेने पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे लागले याचे भाकीत अगोदरच कादंबरीतून चित्रित केल्याचे दिसून येते.



Scanned with OKEN Scanner

एकेकाळी शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय मानला जायचा. घरापुढे गोठे-गुराढोरांनी गजबजलेली व्यवस्था होती. शेतीतून भरपूर चारा उपलब्ध होत असायचा. जनावराच्या चाऱ्याचा प्रश्न सहज सुटायचा. मशागतीसाठी रगदार कंधारी, खिलार अशी बैलजोडी पहायला मिळायची. परंतू कालांतराने निसर्गाच्या लहरीपणामुळे कधी अतिवृष्टी तर कधी अनावृष्टीमुळे संपूर्ण चित्रच अनिश्चित झाले आहे. बऱ्याचदा आभाळात ढग भरपूर येतात परंतु चातकाप्रमाणे वाट पाहणाऱ्या शेतकऱ्याला हे ढग हुलकावणी देतात. पेरणीनंतर 'पाऊस' पडतच नाही. तो उद्ध्वस्त होऊन जातो, याचे वर्णन **कवी शांताराम हिवराळे** समर्पकपणे करतात.

"खेडीपाडी ओस पडताहेत, जनावर हाडहाडताहेत
शहरं अस्तव्यवस्त, हातपाय पसरताहेत
बेकारी, बेरोजगारी, दारिद्र्य
बहरलेल्या काटेरी निवडुंगासारखी, सर्वत्र पसरताहेत
गच्च भरून आलंय आभाळ
वाटलं आता, धुवाँधार बरसेल पाऊस
पण कसलं काया काळीज कोरणारी
ही तर निव्वळ, आभाळभूल"

मानवी मनाचा (खेड्यातील) सर्वांगाने वेध घेणे, समूह संस्कृती याविषयी चिंतन कलाकृतीतून व्यक्त करण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. शहरे बकाल तर खेडे ओस पडत चालली आहेत. याचेही दर्शन तसेच शेतकरी आजही नशिब, दारिद्र्य, दैववाद यावर मोठ्या प्रमाणावर विश्वास ठेवताना दिसतो. त्यांच्या जगण्याला ताण-तणाव गुंतागुंत, उपासमार, पीकपाण्याविषयीची आकांक्षा इ. चे चिंतन त्यांनी 'चारापाणी' कादंबरीत व्यक्त केले आहे. एकूणच कादंबरीतील विषय व आशयसूत्र काळाशी सुसंगत आहे हे मान्य करावे लागते. भारत हा जगातील ७ व्या क्रमांकाचा मोठा देश, कृषीप्रधान तसेच बहुसंख्य जनता खेड्यात राहणारी आहे. त्यांची दयनीय अवस्था सर्वप्रथम महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' मध्ये वर्णिली आहे.

**निष्कर्ष :**

'चारापाणी' कादंबरीतून मराठवाड्यातील चारा व पाण्याची गंभीर समस्या सोबतच शेतकऱ्यांची व जनावरांची हतबलता दाखविली आहे. शिवाय सामान्य शेतकऱ्यांपेक्षा सधन शेतकऱ्यालाच मदत करताना राजकीय इच्छाशक्ती दिसते. आजच्या परिस्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा शेती-शेतकरी परंतू त्यांच्याकडे लक्ष द्यायला कुणालाच वेळ नाही.

या कादंबरीचे प्रेरणास्थान म्हणजे होरपळलेला माणूस, तसेच शेती, शेतकरी, शेतमजूर आणि पशुधनाला केंद्रस्थानी समजून त्यावर चिंतन कादंबरीतून आलेले आहे. कादंबरी लेखनामागील भूमिका ही आत्माविष्कारावर आधारलेली आहे. साहित्यकृती ही त्या-त्या काळचे अपत्य असते याची सत्यता पटते.

**संदर्भग्रंथ :**

१. रा. रं. बोराडे, 'चारापाणी', मेहता प्रकाशन, पुणे, १९९०.
२. (संपा.) डॉ. प्रल्हाद लुलेकर, डॉ. सतीश बडवे, 'मराठवाड्यातील साहित्य', कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद, २००७.
३. (संपा.) प्राचार्य डॉ. आघाव, डॉ. क्षीरसागर, डॉ. वाढे, 'मराठवाड्यातील मराठी कादंबरीची स्वरूप वैशिष्ट्ये', चिन्मय प्रकाशन, २०१३.



176

Scanned with OKEN Scanner